कोरेगाव चंद्रहारच्या उमेदवारीला राष्ट्रवादीची मदत?

बड्या नेत्याच्या समर्थकांचे उद्धव ठाकरेंशी खलबते ; जिल्ह्यात चर्चांना उधाण

सांगली : सांगली लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेसचे विशाल पाटील आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे डबल महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरु झाली आहे. काँग्रेस आणि उबाठा गटाने ही जागा आपणच लढणार असल्याचे सांगून उमेदवारांची घोषणा केली आहे. महाविकास आघाडीत सांगलीची जागा नेमकी कुणाला मिळणार याबाबत प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे.

या परिस्थितीत करेक्ट कार्यक्रमासाठी प्रसिद्ध असलेल्या जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या शरद पवार गटातील एका बड्या नेत्याच्या समर्थकांनी गुरुवारी सांगलीत उद्धव ठाकरेंची एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये गुप्त भेट घेतली. तब्बल तासभर खलबते केले, यामुळे पैलवान चंद्रहार पाटील यांच्या लोकसभेच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने मदत चालू केली आहे की काय ? अशा चर्चांना उधाण आले आहे.

लोकसभा निवडणूक तोंडावर असताना महाविकास आघाडी कडून काँग्रेसचे विशाल पाटील यांची उमेदवारी निश्चित मानली जात होती. दुसरीकडे विद्यमान खासदार संजय पाटील यांना उमेदवारी मिळणार की नाही याबाबत मात्र तर्कवितर्क लढविले जात होते. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत मात्र नेमके उलटे चित्र पहावयास मिळत आहे. भारतीय जनता पक्षाने पहिल्या यादीतच विद्यमान खासदार संजय पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. महाविकास आघाडीत मात्र जागेसाठी रस्सीखेच सुरू झाली. कोल्हापूरची आमची जागा काँग्रेसला सोडली आहे ; त्या बदल्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने सांगलीच्या जागेवर दावा ठोकला.

ऐनवेळी समोर आलेल्या चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीला काँग्रेसनेही सुरुवातीस लाईटली घेतले, पण उबाठा गट हा वेळोवेळी सावध चाली चालत उमेदवारीची मांड पक्की करत चालला आहे. हे लक्षात येताच काँग्रेसचे आमदार विश्वजित कदम यांनी सांगलीची जागा आम्हीच लढणार आणि विशाल पाटील हेच उमेदवार असणार असे जाहीर करुन टाकले.

यानंतर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सांगली लोकसभेची जागा कोणत्याही परिस्थितीमध्ये काँग्रेसला देणार नाही असा पवित्रा घेतला. आम्ही कोल्हापूर लोकसभेची जागा हसत हसत काँग्रेसला सोडलेली आहे. बदल्यात सांगलीची जागा आम्हीच लढणार अशी आक्रमक भूमिका मांडली होती. याला प्रत्युतर म्हणून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही सांगलीची जागा आमचीच असून विशाल पाटील तिथून लोकसभा लढवतील असे जाहीर केले. तर गुरुवारी मुंबईत महाविकास आघाडीची जागावाटप संदर्भात बैठक सुरू असताना शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत अर्ध्यावर बैठक सोडून मिरज येथील संवाद यात्रेसाठी निघून गेले.

सांगलीच्या जागेचा तिढा सुटला नाही, त्यामुळे काँग्रेसने उद्धव ठाकरें यांच्या कार्यक्रमामध्ये उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतला. महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या आमदार सुमन आर. आर. पाटील, युवा नेते रोहित पाटील, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सुरेश पाटील यांनीही कार्यक्रमास जाणे टाळले. उद्धव ठाकरे हे मिरज येथील कार्यक्रम स्थळी जाण्यापूर्वी सांगलीत पंचतारांकित हॉटेलमध्ये थांबले होते. यावेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या एका बड्या नेत्यांचे चार ते पाच समर्थक हॉटेलवर पोहचले. मिलींद नार्वेकर यांच्या माध्यमातून नेत्यांच्या वतीने भेटायला आल्याचा निरोप उध्दव ठाकरे यांना दिला. यानंतर तासभर खलबते झाले. त्यानंतर उध्दव ठाकरे यांनी मिरज येथील मेळाव्यात थेटपणे चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर करुन टाकली.

चंद्रहार पाटील यांचे नाव चर्चेत आले तेंव्हापासून जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यानेच विशाल पाटील यांना उमेदवारी मिळू नये यासाठी देव पाण्यात घातले असल्याची चर्चा दबक्या आवाजात सरु होती. आता त्यांच्या समर्थकांच्या उध्दव ठाकरे यांच्या सोबतच्या भेटीनंतर लगेचच उमेदवारी जाहीर झाल्याने पैलवान चंद्रहार पाटीलच्या उमेदवारीसाठी राष्ट्रवादीने खुराक चालू केला असल्याचे आता उबाठा गटातून सुध्दा ऐकायला मिळू लागले आहे.

पन्हाळ्यात मालमत्ता कर थकविण्यात शासकीय कार्यालये आघाडीवर

पन्हाळा : येथील गिरीस्थान नगरपरिषदेकडून घरफाळा व पाणीपट्टी वसुलीची मोहीम राबविण्यात येत आहे. १६ शासकीय कार्यालयांच्या इमारती व ४३ नागरिकांच्या इमारतींवरील ८२ लाख ४६ हजार इतका मालमत्ता कर थकीत आहे. या मोठ्या थकबाकीदारांमध्ये शासकीय कार्यालयांच्या इमारतींवरील मालमत्ता कर २१ लाख पंधरा हजार इतका असल्याने मालमत्ता कर थकविण्यात शासकीय कार्यालयेच आघाडीवर असल्याचे दिसत आहे. या सर्वच थकबाकीदारांवर जप्ती वसुलीची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी चेतनकुमार माळी यांनी दिली.

आजअखेर ३४ लाख ९२ हजार म्हणजेच ४२.३५ टक्के इतकी वसुली झाली आहे. त्यामुळे पन्हाळा नगरपरिषदेकडून वसुलीची टक्केवारी वाढविण्यावर भर दिला जात आहे. यासाठी नगरपरिषदेने वसुलीची दोन टप्प्यात मोहीम राबवली आहे. यातील पहिल्या टप्यात नागरिकांची नळ जोडणी तोडणे सुरू आहे, तर उद्यापासून दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होणार असून, त्यामध्ये वस्तूंची जप्ती करून लिलावाद्वारे वसुली केली जाणार आहे. तसेच मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता सील केल्या जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी जप्तीची व इतर कारवाई टाळण्यासाठी कराची रक्कम तत्काळ भरावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

ही मोहीम नगरपरिषद संचालनालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबवली जात आहे. त्यामधील शासकीय कार्यालयाकडील मालमत्ता कर वसुलीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे मार्गदर्शन घेऊन वसुली मोहीम राबविणार आहोत.

चेतनकुमार माळी, मुख्याधिकारी, पन्हाळा नगरपरिषद

पुढील आठवड्यात शासकीय कार्यालयात जप्तीची कारवाई करणार असल्याचे मुख्याधिकारी माळी यांनी सांगितले. या मोहिमेत कर प्रशासकीय अधिकारी अमित माने, सहा. कर निरीक्षक अवंती पाटील, विश्वास रामाणे, सुहास भोसले, नंदकुमार कांबळे, रवींद्र पारपोलकर, नेल्सन फर्नांडिस, उदय रासकर आदींचा सहभाग आहे.

चांदोली मत्सबीज प्रकल्प शासनाकडून दुर्लक्षितच

सांगली, सातारा, कोल्हापूरला पुरेल इतके मत्स्यबीज निर्मितीची क्षमता

शिराळा : तालुक्याचे वैभव असणाऱ्या चांदोलीधरणाच्यापायथ्याला सुमारे पाच कोटी रुपये खर्चून बांधलेला मत्स्यबीज प्रकल्प गेली दोन-तीन वर्षे झाली वापराविना पडून आहे. यामध्ये एकाही माशाचे बीजोत्पादन झालेले नाही, हे दुर्दैव म्हणावे लागेल. चांदोलीधरण, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प या प्रमुख पर्यटन स्थळांबरोबरच चांदोलीचा मत्स्यबीज प्रकल्प पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. याकडे मत्स्य विभाग, जिल्हा प्रशासनाकडून होणारे दुर्लक्ष यामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी वाया जात आहे.

माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक यांनी तत्कालीन मंत्री रामराजे निंबाळकर यांच्यामार्फत हा दहा एकरमधील तीन जिल्ह्यांना फायदेशीर ठरणारा प्रकल्प मंजूर केला. जिल्हा वार्षिक नियोजन योजनेंतर्गत सुचवलेल्या या प्रकल्पाची उभारणी पूर्ण झाली आहे. यातून चांदोलीच्या पर्यटनाला गती मिळणार असून, चांदोलीच्या वैभवात आणखीनच भर पडणार आहे. शिवाय स्थानिकांना रोजगार मिळण्याच्या आशा पल्लवित झाल्या होत्या.-ऊतएठढखडएचएछढप्रकल्पाची उभारणी करताना मत्स्यबीज प्रकल्पातील तळ्याच्या बांधकामाचा भराव ठिकठिकाणी वाहून गेला होता. भरावाला भेगादेखील पडल्या होत्या. सांगलीच्यासहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्रस्थापित केलेल्या ४ कोटी ८८ लाख ८६ हजार खर्च करून बांधला आहे.

पर्यटन, रोजगार वाढेल तसेच येथील मत्स्य व्यावसायिकांना उपयोग होईल, यासाठी हा प्रकल्प सुरू होणे आवश्यक आहे.

-शिवाजीराव नाईक माजी राज्यमंत्री

अधिकाऱ्यांची उदासिनता

तीन जिह्यांसाठी उपयोगी ठरणारा तसेच स्थानिकांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प मंजूर केला. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांना तसेच या विभागाच्या अधिकाऱ्यांना वारंवार लेखी, तोंडी सांगितले आहे. मात्र, हा प्रकल्प सुरू करण्याबाबत उदासिनता दिसून येते.

या मत्सबीज प्रकल्पात ८०० चौरस मीटरची तेरा तळी बांधली आहेत. प्रत्येक तळ्यामध्ये उतरण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्था आहे. सूर्यकिरणांमुळे मत्सबीज नष्ट होऊ नये म्हणून कलर कोटेड शेड उभारली जाणार आहेत. उपकरणे व इतर साहित्यासाठी स्वतंत्र इमारत उभी केली जाणार आहे.

या प्रकल्पांतर्गत मत्स्यबीजाची पैदास करणे, त्यांचे पालनपोषण करणे तसेच मोठ्या माशांची निर्मिती करून त्यांची देखभाल करणे, मत्स्य पिलांची साठवण करणे असे नियोजन या प्रकल्पात केले जाणार आहे. धरणाच्या पायथ्याला हा प्रकल्प उभारण्यात येत असल्यामुळे चांदोली धरणातील पाण्याचा वापर करून मत्स्य बिजापासून मोठ्या माशांचे उत्पादन घेणे शक्य होणार आहे. नदीतील येणारे पाणी तळ्यांमध्ये साठवण्यासाठी फिल्टर चेंबर बांधण्यात येणार आहेत. तळ्यातील पाण्याचा निचरा होण्यासाठी तसेच सांडपाणी व्यवस्था मोरी बांधकाम करण्यात येणार आहे. जवळच असणाऱ्या वारणा कालव्यातील पाणी सायफन पद्धतीने तलावात सोडण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीनंतर स्थानिकांना रोजगार मिळणार आहे.

विरोधात मतदान करण्याचा पेन्शनराचा ठराव

वारणानगर : देशात गुन्हेगारी करून अटकेत असलेले व गुन्ह्याची शिक्षा भोगत असलेल्या प्रत्येक कैद्यावर उदरनिर्वाहासाठी सरकार प्रतीदिन ८० रुपये खर्च करीत असुन याच देशात खाजगी,सहकार, निमसरकारी सेवानिवृत्त झालेल्या कर्मच्याऱ्यांना हक्काचे पैसे असून देखील प्रतिदीन ३० ते ५० रुपये मिळतील या हिशोबाने सरकार पेन्शन देत आहे. अल्प पेन्शनमुळे पेन्शनरांचे वार्धक्यातील जीवन जगणे बिकट होत आहे.

भाजपा सरकारने सत्तेवर येताना आश्वासन देऊन १० वर्षे उलटली तरीदेखील पेन्शनवाढ झाली नसल्याने येत्या लोकसभा निवडणूकीत सत्ताधारी पक्षाविरोधात मतदान न करण्याचा ठराव निवृत्त कर्मचारी ईपीएस ९५ राष्ट्रीय समन्वय समिती नवी दिल्ली या संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

निवृत्त कर्मचारी ईपीएस ९५ राष्ट्रीय समन्वय समिती नवी दिल्ली या संघटनेची केंद्रीय कार्यकारिणीची बैठक वर्धा येथे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश येंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत सत्ताधारी पक्षा विरोधात मतदान करण्याचा ठराव करण्यात आला. संघटनेने हा निर्णय एकाएकी घेतलेला नाही. संघटनेने दिल्ली येथे जंतर मंतर, रामलीला मैदानावर तसेच देशात विविध ठिकाणी दहा वर्षात आंदोलने केली आहेत केंद्रीय कामगार मंत्री भूपेंद्र यादव यांना दिलेल्या निवेदनात सरकारने पेन्शन वाढ केली नाहीतर विरोधात मतदान करण्याचा इशारा दिला होता तसे भेटून देखील स्पष्ट सांगितले होते असे सभाध्यक्ष येंडे यानी सांगितले.

आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सरकारने पेन्शन वाढ केली नाही देशातील ७८ लाख पेन्शनधारक आणि २८ कोटी कार्यरत सदस्य कर्मचारी यानी यावेळच्या लोकसभा निवडणूकीत सत्ताधारी भाजपा मित्र पक्षाच्या सरकारला मतदान न करण्याचा एकमुखी ठराव सर्व राज्यांच्या अधिकाऱ्यांनी हात वर करून आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आल्याचे सभाध्यक्ष प्रकाश येंडे यांनी सांगितले.

आम्ही सरकारकडे भीक मागत नाही पेन्शनरांचे कामावर असताना प्रत्येक महिन्याच्या पगारातून फंड पेन्शनसाठी कपात केलेली सन मार्च २०२३ च्या महालेखापालांच्या अहवालानुसार ची रक्कम ७ लाख ८० हजार ३०८ कोटी रुपये सरकारकडे जमा आहे. त्या जमा रकमेवर सरकारला ५१ हजार ९८५ कोटी रु.व्याज मिळाले, त्या व्याजाच्या रक्कमेतून पेन्शन धारकांना वार्षिक पेन्शनसाठी सरकारला १४४४४ कोटी इतका खर्च आला, तिही सरकारकडे अतिरिक्त रक्कम आहे. ३७ हजार ५४० कोटी रुपये व्याजातून शिल्लक रक्कम राहते.

निवृत्तीवेतन धारकांची दावा न केलेली रक्कम

६८ हजार ७९० कोटी रुपये सरकारकडे जमा आहे असे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भिमराव डोंगरे यांनी सांगितले. सरकारकडे ईपीएस ९५ पेन्शन धारकांच्या पगारातून जमा झालेली हक्कांची रक्कम आहे आम्ही आमच्या जमा पैशातील रक्कमेतून

सद्याच्या महागाई निर्देशांकानुसार मासिक ९००० रुपये व त्यावर नियमानुसार महागाई भत्ता मिळावा अशी संघटनेची सातत्याने मागणी केली होती तरी देखील पेन्शन मध्यें वाढ करण्याचा निर्णय सरकार घेत नाही. पेन्शन धारकांसाठी इतर योजनांच्या जाहिरातीसाठी २८३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी कॅगच्या अहवालात ही माहिती दिली आहेत असे राष्ट्रीय उपाध्यक्ष पुंडलिक पांडे यांनी सांगितले.

गत दहा वर्षात चार लाख ज्येष्ठ निवृत्ती वेतनधारकांचा मृत्यू झाला आहे. एक हजार रुपयाच्या आत ५०० ते ९०० रुपये पर्यन्त ३६ लाख पेन्शनर आहेत उर्वरीत १ ते ३ हजार पर्यन्त निवृत्ती वेतन घेणारे पेन्शनर आहेत हि पेन्शन पती पत्नी मिळून मिळते यातील एक व्यक्ती मृत झाल्यास मिळणाऱ्या पेन्शनच्या निम्मी रक्कम मिळते त्यामुळे या जेष्ठ नागरिकांना सद्यांच्या महागाईत सन्मानाने

जगता येत नाही तरीही सरकार पेन्शन वाढवू इच्छित नाही. त्यामुळे भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या निषेधार्थ केंद्रीय कार्यकारिणीला मतदान करणे भाग पडले आहे असे राष्ट्रीय सरचिटणीस प्रकाश पाठक यांनी बैठकीत सांगून सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची देखील अंमलबजावणी सरकारने केली नाही असे सांगितले.

निसर्ग सेवा समिती, वर्धा चे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांच्या हस्ते केंद्रीय कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन झाले.

निवेदिका सौ पल्लवी पुरोहित यानी सूत्रसंचलन केले.

राज्य सरकारकडून मराठा समाजाची फसवणुक झाल्याची भावना

हातकणंगले : राज्य सरकारकडून मराठा समाजाची फसवणुक झाल्याची भावना मराठा समाजातील युवकांची झाली आहे . मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात मोठे आंदोलन ही उभे करण्यात आले. त्याला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून न भूतो न भविष्यती असा प्रतिसादही मिळाला . याच आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारकडून ओबीसी ऐवजी सरसकट दहा टक्के आरक्षण देण्यात आले मात्र हे आरक्षण आंदोलन कर्त्यांना मान्य नसल्याने त्यांचे आंदोलन सुरूच आहे.आरक्षण दिले खरे मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात राज्य सरकार पुर्ण पणे अपयशी ठरले आहे . ज्या पोर्टल मधुन मराठा समाज बांधवांना दहा टकके आरक्षणाचे दाखले दयायचे होते , ते पोर्टलच काही दिवसांपासुन बंद आहे . त्यामुळे हेलपाटे मारूनही दाखले मिळत नसल्याने मराठा समाजात संतापाची लाट आहे .

एकीकडे राज्य सरकारकडून राज्यात पोलिस भरतीची जाहिरात प्रसिद्ध करून दहा टक्के मराठा समाजासाठी आरक्षण लागुही केले , यामुळे मराठा समाजातील पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांमध्ये चैत्यन्याचे वातावरण पसरले होते , मात्र पोर्टलवरून दाखलेच उपलब्ध होत नसल्याने व भरतीसाठी अर्ज करण्याची मुदत काहिच दिवसात संपणार असल्याने याची चिंता वाढली आहे .एकीकडे ओबीसी कोटयातून आरक्षणाची मागणी असताना सरकारने स्वतंत्र्य दहा टक्के आरक्षण देऊन मराठा समाजाच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे . तर दुसरी कडे दिलेल्या दहा टक्के आरक्षणाची अंमलबजावनीही सरकारकडून झालेली नाही .

एकीकडे राज्य सरकारकडून लोकसभेच्या तोंडावर पोलिस भरतीची घोषणा झाली त्याची मुदतही मार्च अखेरीस संपणार आहे . असे असले तरी मराठा समाजातील पोर्टलच्या अडचणीमुळे अद्यापही दाखले मिळालेले नाहीत , दाखले मिळालेच नाहीत तर तर पोलिस भरतीसाठी अर्ज करायचे कसे असा प्रश्नच पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांसमोर उभा राहिला आहे.

राज्य सरकारकडून हेतुपूर्वक व जाणुन बुझून मराठा समाजाची फसवणूक केली जात आहे , मराठा समाजातील तरूणांना जाणिव पूर्वक दाखले देण्यामध्ये अडथळे निर्मान कैले जात आहेत , हक्काच्या आरक्षणासाठी आमची लढाई थांबलेली नाही , या सगळ्याचे उत्तर मराठा समाज आगामी लोकसभा निवडणूकीत निश्चीतच देईल

हणमंत पाटील , राज्य समन्वयक , मराठा क्रांती मोर्चा

त्यामुळे एकीकडे दहा टक्के आरक्षण जाहिर केले असले तरी देखील त्याचा काहिच फायदा मराठा समाजाला होणार नाही , तर दुसरी कडे दाखल्यांसाठी हेलपाटे मारूनही दाखले मिळत नसल्याने पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे .एकंदरीतच सरकार बद्दल मराठा समाजामध्ये प्रचंड चिड निर्मान झाली असुन , राज्य सरकारकडून फसवणूक झाल्याची भावना समाजाची झाली आहे .

कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ५१ हजार दूध उत्पादक अनुदानापासून राहणार वंचित

कोल्हापूर : राज्य शासनाच्या गायदूधअनुदानापासून जिल्ह्यातील सुमारे ५१ हजार १३३ शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार आहेत. आतापर्यंत पहिल्या दहा दिवसात (११ ते २० जानेवारी) ४० हजार शेतकऱ्यांनाच अनुदान मिळणार आहे. जिल्ह्यातील गायदूधसंकलन पाहता दहा दिवसात ६ कोटी रुपये अनुदान मिळणे अपेक्षित होते मात्र, २ कोटी ५९ लाख रुपये अनुदान मिळणार आहे. जाचक अटी आणि तांत्रिक अडचणीमुळे पात्र शेतकरी अपात्र ठरणार आहेत.

गाय दुधाचे दर कमी झाल्याने राज्य शासनाने गाय दूध उत्पादकांना दोन महिन्यासाठी (११ जानेवारी ते १० मार्च २०२४ अखेर) प्रतिलिटर पाच रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार निकष देऊन दूध उत्पादकांसह पशुधनाची माहीती ऑनलाइन भरण्याची सूचना दिली. जिल्ह्यात 'गोकुळ'चे सर्वाधिक ८१ हजार गाय दूध उत्पादक आहेत. मात्र, माहिती भरण्याची प्रक्रिया क्लिष्ट असल्याने अनेक शेतकऱ्यांना सहभाग घेता आला नाही. तर काहींनी मराठीतच माहीती भरल्याने तांत्रिक कारणामुळे अपात्र ठरले आहेत.

'वारणा', 'वैजनाथ' दूध संघांच्या २४ हजार ५९० शेतकऱ्यांच्या खात्यावर १ कोटी ५१ लाख ५९ हजार रुपये जमा झाले आहेत. आता १ कोटी १ लाख ५२ हजार रुपये वर्ग होण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, जिल्ह्यात ९१ हजार ६०१ गाय दूध उत्पादक शेतकरी आहेत. त्यापैकी ४० हजार ४६६ शेतकऱ्यांना अनुदान मिळणार आहे. उर्वरित जवळपास ५१ हजार शेतकरी वंचित राहण्याची शक्यता आहे.दुग्ध विभागाच्या प्रयत्नामुळेच सर्वाधिक अनुदान

दुग्ध विभाग व गोकुळ दूध संघाच्या यंत्रणेमुळे राज्यात सर्वाधिक अनुदान कोल्हापुरात मिळाले आहे. दुग्ध विभागात अपुरी कर्मचारी संख्या असतानाही त्यांनी युद्ध पातळीवर काम केल्यानेच हे शक्य झाले.

आता पहिल्या दहा दिवसाची माहिती भरली आहे. पण, मार्च अखेर अनुदानाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावेच लागणार आहेत. त्यामुळे दोन महिन्याची माहीती भरण्यासाठी सोमवार (दि.२५) पर्यंतची मुदत दिली आहे.

कोडोली ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सौ. स्वाती प्रकाश हराळे यांची बिनविरोध निवड

वारणानगर : कोडोली ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सौ. स्वाती प्रकाश हराळे यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा कोडोलीचे मंडल अधिकारी अभिजित पवार यांनी जाहिर केली.

कोडोली ग्रामपंचायतीचे सरपंच पद सर्वसाधारण महिला साठी राखीव असल्याने सर्व विजयी महिला सदस्यांना नेतृत्व संधी प्राप्त करून देणेसाठी ठरल्याप्रमाणे सरपंच पदाचा भारती प्रकाश पाटील यानी राजीनामा दिल्याने कोडोलीचे सरपंच पद रिक्त झाले होते. या जागेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत पवार यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्यांच्या विशेष बोलाविलेल्या सभेत ग्रामपंचायत सदस्या स्वाती हराळे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने तसेच मुदत संपेपर्यन्त कोणीही अर्ज दाखल न झाल्याने स्वाती हराळे यांची सरपंच पदी निवड झाली.

सन २०२१ मध्ये पार पडलेल्या कोडोली ग्रामपंचायत निवडणुकीत माजी मंत्री आमदार डॉ.विनय कोरे, गोकुळ संचालक अमरसिंह पाटील, यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ जयंत पाटील या परस्पर कट्टर विरोधी गटाने एकत्रित येवून निवडणूक लढवत सत्ता स्थापन केली होती. नूतन सरपंच सौ. स्वाती हराळे यांचा सत्कार गोकुळ संचालक अमरसिंह पाटील व वारणा बझारच्या अध्यक्षा सौ. शुभलक्ष्मी कोरे यांनी केला. यावेळी कोडोली अर्बन बँकेचे चेअरमन राहुल पाटील, वारणा दूध संघाचे संचालक शिवाजी कापरे, वारणा साखर कारखाना संचालक सुभाष पाटील, वारणा बँकेचे संचालक प्रमोद कोरे, तलाठी अनिल पोवार जनसुराज्य शक्ती पक्षाचे प्रवक्ते ड. राजेंद्र पाटील कोडोली चे उपसरपंच प्रविण जाधव माजी सरपंच,माजी उपसरपंच यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी जयवंत चव्हाण यानी स्वागत केले राजेंद्र कापरे यानी आभार मानले. निवडीनंतर समर्थकांनी गुलालाची